# महाराष्ट्र विधानसभा

## <u>पत्रक भाग दोन</u>

## <u>गुरुवार, दिनांक १८ एप्रिल, २०१९ / चैत्र २८, १९४१ (शके)</u>

## <u>लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण</u>

**३९**. सर्व सन्माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात येते कि, सन २०१८ चे तृतीय (हिवाळी) सत्र शुक्रवार, दिनांक ३० नोव्हेंबर, २०१८ रोजी संस्थगित झाले. उपरोक्त दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविल्यानुसार लक्षवेधी सुचनांसंदर्भातील जोडपत्रामधील प्रलंबित **२९** लक्षवेधी सूचनांपैकी **२६** लक्षवेधी सूचनांची निवेदने सोमवार, दिनांक १८ फेब्रुवारी, २०१९ रोजी पत्रक भाग दोन व्दारे वितरीत करण्यात आलेली आहेत. आता प्रलंबित **3** निवेदने शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत.

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : १८ एप्रिल, २०१९.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार)**
**महाराष्ट्र विधानसभा.**

**<u>याची प्रत</u> :**

१ महाराष्ट्र विधानसभेचे सर्व संबंधित सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (website.)

लक्षवेधी सूचना                                                                                                    गृह विभाग

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०१८ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन

**सर्वश्री. राधाकृष्ण विखे -पाटील,विजय वडेट्टीवार, अमीन पटेल, अस्लम शेख वि.स.स.** यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे.

" मौ. येवलेवाडी, ता. हवेली,जि. पुणे येथील अनेक शेतकरी व ग्रामस्थांनी त्यांच्या जमिनीचे हक्क मे. पुणे कोंढवा रियॅल्टी प्रा.लि. कंपनीच्या नावे करणे, त्या मोबदल्यापोटी सदर कंपनीने ग्रामस्थांना " द लेक डिस्ट्रीक्ट " या गृह प्रकल्पातील सदनिका मालकी तत्वावर देण्याचे मान्य करणे, परंतु आजतागायत सर्व्हे नं. १६, हिस्सा नं. १/४ पैकी ०० हे. २३ आर व सर्व्हे नं. १६, हिस्सा नं. १/१० पैकी ०० हे. ८३ आर क्षेत्र जमिनीच्या मोबदल्यापोटी काही शेतकऱ्यांना अद्यापही सदनिका न मिळणे, याबाबत मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचेकडे दि. ६ सप्टेंबर, २०१८ रोजी करण्यात आलेली तक्रार, मे. पुणे कोंढवा रियॅल्टी प्रा.लि. कंपनीचे डायरेक्टर व अधिकारी यांनी जाणुनबुजून अनेक शेतकरी व ग्रामस्थांची केलेली फसवणूक , परिणामी शेतकरी व ग्रामस्थांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष , याप्रकरणी शासनाने तातडीने संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून , शेतकरी व ग्रामस्थांवर झालेला अन्याय दूर करून तत्काळ करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका "

---

## <u>मा.मुख्यमंत्री यांचे निवेदन</u>

मौजे येवलेवाडी ता. हवेली, जि.पुणे येथील सर्व्हे नं. १६/१/४ क्षेत्र ० हे २३ आर व सर्व्हे नं. १६/१/१० पै क्षेत्र ० हे ८० आर या मिळकतीस जिल्हाधिकारी , पुणे यांच्या दि. १९.७.२०१३ अन्वये निवासी प्रयोजनार्थ **अकृषिक परवानगीसह** महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १८ नुसार **सुधारीत बांधकाम नकाशांना मंजुरी देणेत** आलेली आहे. तसेच पुणे कोंढवा रिॲलिटी प्रा.ली. यांनी मौजे येवलेवाडी ता. हवेली, जि. पुणे येथील सर्व्हे नं. १६/१/४ क्षेत्र ० हे २३ आर व सर्व्हे नं. १६/१/१० पै क्षेत्र ० हे ८० आर या मिळकतीबाबत ७/१२ उताऱ्यावरील कब्जेदार यांचेकडून नोंदणीकृत कुलमुखत्यार पत्र दि. ३१.७.२००८ रोजी करून घेतलेले आहे.विषयांकीत मिळकतीबाबत पुणे कोंढवा रिॲलिटी प्रा.ली यांनी ७/१२ वरील कब्जेदार यांचेकडून नोंदणीकृत विकसन करारनामा करून घेतलेला असल्याचे दिसून येते.

मे. पुणे कोंढवा रियॅल्टी प्रा.लि. कंपनीचे डायरेक्टर राजेश चौलकर व श्री. रुस्तम भरूचा यांचेकडून ठरलेल्या वेळेत सदनिकांचा ताबा न देणे तसेच ताबा विलंबाची नुकसान भरपाई न देणे तसेच सदनिकांची परस्पर तिऱ्हाईत व्यक्तीस विकून फसवणूक केल्याबद्दल श्री. अनिल दिनकर शेडगे व सौ. सुजाता बापुराव कोंढरे , रा. मु.पो. आंबेगाव, ता. हवेली, जि. पुणे यांनी मा. मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक ६.९.२०१८ रोजी केलेली तक्रार शासनास प्राप्त झालेली आहे. तसेच अर्जदार श्री. किसन अर्जून कामठे व श्री. अनिल दिनकर शेंडगे यांनी त्यांच्या दिनांक १४.१.२०१७ च्या अर्जान्वये वरिष्ट पोलीस निरीक्षक, कोंढवा पोलीस स्टेशन, पुणे यांचेकडेही तक्रार केली होती. त्या अर्जाच्या चौकशीच्या अनुषंगाने अर्जदारास कोंढवा पोलीस स्टेशन येथे हजर राहणेबाबत कळविले असता अर्जदार चौकशीकामी पोलीस स्टेशन येथे हजर राहीले नाही. तशी ठाणे दैनंदीनी मध्ये क्र. २०/२०१८ , दि. २३.७.२०१८ अन्वये नोंद घेण्यात आलेली आहे. तसेच अर्जाचे चौकशी कामी हजर राहणेकरीता अर्जदार यांना समजपत्र देण्यात आलेली होती. परंतु अर्जदार चौकशीकामी हजर न राहील्याने तक्रारदाराचा अर्ज दप्तरी दाखल करण्यात आला आहे.

RDTAIH 1254(800-2-2019).

-********-

**लक्षवेधी सूचना क्र.५८**

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०१८ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

सर्वश्री.सुनिल शिंदे, सुनिल प्रभू, राधाकृष्ण विखे-पाटील, विजय वडेट्टीवार, मो.आरिफ नसीम खान, अमित देशमुख, अमीन पटेल, त्र्यबंकराव भिसे, प्रा.वर्षा गायकवाड, सुनिल केदार, अमर काळे, अस्लम शेख, हर्षवर्धन सपकाळ, डॉ.संतोष टारफे, अब्दुल सत्तार, ॲड.यशोमती ठाकूर, श्री.कुणाल पाटील, श्रीमती निर्मला गावित, सर्वश्री भारत भालके, बाळासाहेब थोरात, प्रा.विरेंद्र जगताप, सर्वश्री राहुल बोंद्रे, अमित झनक, जयकुमार गोरे, संग्राम थोपटे, विश्वजीत कदम, शेख आसिफ शेख रशीद, डी.पी.सावंत, वसंतराव चव्हाण,पृथ्वीराज चव्हाण वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.५८ पुढीलप्रमाणे आहे :-

"वाहनांची तपासणी न करता आर्थिक व्यवहारातून बोगस प्रमाणपत्र वितरित केल्यामुळे राज्यातील आरटीओ कार्यालयातील ७० पैकी ३७ अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले असल्याचे माहे ऑक्टोबर,२०१८ च्या सुमारास निदर्शनास येणे, वाहनांना योग्यता प्रमाणपत्रे देताना नियमानुसार काटेकार तपासणी करण्याचे आदेश दिलेले असतानाही नागपूर, गडचिरोली, चंद्रपूर, पुणे, कोल्हापूर, औरंगाबाद, यवतमाळ, पनवेल, अमरावती आणि ठाणे यासह राज्यातील अनेक उप प्रादेशिक परिवहन कार्यालयातील अधिकाऱ्यांनी वाहनांची काटेकोर तपासणी न करता दलालाच्या माध्यमातून आर्थिक व्यवहार करुन बोगस योग्यता प्रमाणपत्र मोठया प्रमाणात वितरित करण्यात येणे, यात अधिकारी व दलालांची मोठी साखळी निर्माण होणे, या गंभीर प्रकरणाची तक्रार होताच शासनाने काही प्रमाणात केलेल्या चौकशीत राज्यातील अनेक उप प्रादेशिक परिवहन कार्यालयातील जवळपास ७० आरटीओनी वाहनांची तपासणी न करता योग्यता प्रमाणपत्र वितरित केल्याचे आढळून आल्याने त्यातील फक्त ३७ अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात येणे, राज्य शासनाच्यावतीने ही कार्यवाही करीत असताना वरिष्ठ अधिकाऱ्यांना पाठीशी घालून कनिष्ठ अधिकाऱ्यांवर ठपका ठेवून कारवाईचा बडगा उगारला जात असल्याने राज्यभरातील आरटीओ अधिकाऱ्यांमध्ये प्रचंड अस्वस्थता असणे, शासकीय कार्यालयातूनच वाहनाचे बोगस योग्यता प्रमाणपत्र वितरित करण्यात येत असून वाहनांचे वारंवार अपघात होऊन निरपराध लोकांचा बळी जात असणे, या गंभीर प्रकरणात दोषी असलेल्या अधिकाऱ्यांवर अद्यापही कारवाई होत नसल्यामुळे नागरिकांत पसरलेला असंतोष, परिणामी या गंभीर प्रकरणात दोषी असलेल्या सर्व अधिकाऱ्यांवर कारवाई होण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया"

## <u>नि वे द न</u>

**{श्री.दिवाकर रावते, मा.मंत्री (परिवहन)}**

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्र.२८/२०१३ मध्ये दि.१८/२/२०१६ रोजी परिवहन संवर्गातील वाहनांना योग्यता प्रमाणपत्र देताना केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ मधील नियम ६२ व महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ४५ मधील विहित तरतुदीनुसार काटेकोर तपासणी करण्याचे तसेच राज्यातील परिवहन कार्यालयांमध्ये कॅमेऱ्यांची व्यवस्था करण्याचे आदेशीत केले आहे.

(कृ.मा.प.

तद्नंतर मा.उच्च न्यायालयाने दि.४/५/२०१७ रोजीच्या आदेशान्वये प्रादेशिक परिवहन कार्यालय, औरंगाबाद, पुणे, कोल्हापूर, पनवेल, ठाणे व उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, यवतमाळ या ६ कार्यालयात दि.२०/३/२०१७ रोजी योग्यता प्रमाणपत्र जारी करण्यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीचे चित्रिकरण (व्हिडिओ रेकॉर्डीग) सादर करण्याचे आदेश दिले. त्यानुसार चित्रिकरण सादर केल्यानंतर मा. उच्च न्यायालयाने दि.२/८/२०१७ च्या आदेशान्वये परिवहन कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या समितीमार्फत ते तपासण्याचे आदेश दिले. त्यानुसार तपासणी अहवाल समितीने मा.उच्च न्यायालयास सादर केला.

उपरोक्त अहवालात संबंधित कार्यालयातील काही अधिकाऱ्यांनी परिवहन वाहनांना योग्यता प्रमाणपत्र जारी करताना / नुतनीकरण करताना विहित तरतूदी / कार्यपध्दतीनुसार काटेकोर तपासणी न करता योग्यता प्रमाणपत्र जारी केल्याचे नमूद आहे.

तद्नंतर मा.उच्च न्यायालयाने त्यांच्या आदेशांची अंमलबजावणी न झाल्याने दि.०७.०८.२०१८च्या आदेशान्वये मा.प्रधान सचिव (परिवहन) यांचेविरुध्द मा. उच्च न्यायालयाच्या अवमानाची नोटीस बजावली आहे. त्यामध्ये मा. उच्च न्यायालयाने नियमबाह्यपणे वाहनांना योग्यता प्रमाणपत्र दिलेल्या अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने कोणतीही कारवाई केली नसल्याचे नमूद करुन नाराजी व्यक्त केली होती.

उक्त पार्श्वभूमी विचारात घेऊन शासनाने दि.२१.०९.२०१८ च्या आदेशान्वये वरील ६ कार्यालयातील २८ मोटार वाहन निरिक्षक व ९ सहायक मोटार वाहन निरिक्षक अशा ३७ अधिकाऱ्यांना निलंबित करुन, त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच संबंधीत कार्यालयातील नियंत्रक अधिकाऱ्याविरुध्दही शिस्तभंगाची कारवाई का सुरु करु नये याबाबतची कारणे दाखवा नोटीस संबधितांना बजाविण्यात आलेल्या आहेत. वरील ३७ अधिकाऱ्यांव्यतिरिक्त ठाणे कार्यालयातील आणखी ७ मोटार वाहन निरिक्षक व ७ सहायक मोटार वाहन निरिक्षक अशा १४ अधिकाऱ्यांनाही दि.१९.१२.२०१८ च्या आदेशान्वये निलंबित करुन, त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार या अधिका-यांविरुध्द आवश्यक ती दोषारापपत्रे निर्गमित करण्यात आली आहेत.

वरीलप्रमाणे वस्तुस्थिती निदर्शनास आल्यानंतर वाहनांची काटेकोर तपासणी होण्याकरिता परिवहन आयुक्त कार्यालयाने वेळोवेळी मार्गदर्शक सूचना जारी केलेल्या आहेत. त्यामध्ये विभागातील मोटार वाहन निरिक्षक व सहायक मोटार वाहन निरिक्षक यांना वाहन तपासणी प्रशिक्षण देणे, वाहनांची परिणामकारक तपासणी होण्यासाठी तपासणी कोटा निश्चित करणे, तपासणी करण्यात आलेल्या काही वाहनांची नियंत्रक / पर्यवेक्षक यांनी पुर्नतपासणी करणे, वाहनांची तपासणी करण्यासाठी ऑनलाईन वेळ देणे, शालेय वाहतूक करणाऱ्या वाहनांची एप्रिल ते जून या उन्हाळी सुट्टीच्या कालावधीत फेर तपासणी करणे इत्यादी बाबींचा समावेश आहे. तसेच शासनानेही भविष्यात अशी प्रकरणे उद्भवू नयेत यासाठी आवश्यकत्या उपाययोजना करण्याच्या सूचना दिलेल्या असून, तसे आढळल्यास संबंधीत अधिकारी व नियंत्रक अधिकाऱ्यांना थेट जबाबदार धरण्यात येईल, असेही स्पष्ट करण्यात आलेले आहे.

********

H 1265-L..

महाराष्ट्र विधानसभा

सन २०१८ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

डॉ. संतोष टारफे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

“पालघर जिल्हयातील तारापूर औदयोगिक वसाहतीत असलेले अनेक रासायनिक व इतर उदयोग, या उदयोगातून निघणारे सांडपाणी विनाप्रक्रिया येथील समुद्रात व नवापूर खाडीत सोडण्यात येणे, याशिवाय मोठयाप्रमाणात घातक घन कचरा डम करुन अवैध पध्दतीने नाल्यामध्ये किंवा समुद्रात सोडणे, येथील विराज प्रोफाईल इंडस्ट्रीज मोठे स्टील व इतर साहित्य उत्पादित करणारी कंपनी नियमांचे उल्लंघन करुन येथील खाडी व समुद्रात मोठया प्रमाणात घनकचरा व विनाप्रक्रिया सांडपाणी समुद्रात सोडणे, या कारणामुळे येथील खाडी-समुद्र येथील जैवविविधतात धोक्यात येणे, वारंवार मासे मरण्याच्या घटना घडणे, त्यामुळे येथील मच्छिमारीचा व्यवसाय धोक्यात येऊन मच्छिमारांच्या उदरनिर्वाहचा गंभीर प्रश्न निर्माण होणे जल-वायु प्रदुषण होऊन नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत असतानाही त्याकडे शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी येथील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना त्यामुळे शासनाने येथील उदयोगावर करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रया.”

**मा.मंत्री पर्यावरण यांचे निवेदन**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडाने तारापूर औद्योगिक वसाहतीची स्थापना सन १९७२ साली करुन विकसित केली आहे. या वसाहतीमध्ये मुख्यत्वे मोठे मध्यम व लहान स्वरुपाचे रासायनिक व कपडयांवर प्रक्रिया करणारे तसेच इंजिनिअरींग असे ११३८ कारखाने कार्यरत आहेत. या वसाहतीतील मोठया व मध्यम स्वरुपाच्या उद्योगांनी त्यांच्या उत्पादन प्रकियेत निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी प्रथम, द्वितीय व काही उद्योगांनी तृतीय स्वरुपाची प्रक्रिया यंत्रणा उभारलेली असून उद्योगामधून निर्माण होणाऱ्या घातक घनकचरा शास्रोक पध्दतीने विल्लेवाट लावण्यासाठी मे. मुंबई वेस्ट मॅनेजमेंट तळोजा येथे पाठविण्यात येतो.

दिनांक १९ ऑगस्ट,२०१८ रोजी बोईसर चिल्लार फाटा रोडच्या कडेला अज्ञाता कडून घातक घनकचरा टाकण्यात आलेची माहिती मिळताच तळोजा येथे कार्यरत असलेल्या सामाईक घातक घनकचरा हाताळणी व विल्हेवाट, केंद्राशी संपर्क करुन त्वरीत त्यांच्या अधिकृत वाहनाद्वारे (१६टन)

इतका घातक घनकचरा शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट करण्यासाठी पाठविण्यात आला. सदरहू घनकचऱ्याचे पृथ:करण अहवाल अद्याप अप्राप्त आहेत.

टीईपीएस-सामूहिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेची २५ एमएलडी एवढे क्षमतेची असून हा प्रकल्प सध्यस्थितीत कार्यरत आहे. सदर प्रक्रिया यंत्रणेमध्ये प्राथमिक, द्वितीय व त्रितीय स्वरुपाची यंत्रणा उभारली आहे. तृतीय स्वरुपाची यंत्रणा मागील दोन वर्षापासून बंद स्थितीत आहे. परंतु योग्यरितीने देखभाल न केल्याने प्रकियायुक्त सांडपाण्याची गुणवत्ता संमतीपत्रात नमूद केलेल्या विहीत मर्यादेत आढळून येत नाहीत.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने टीईपीएस-सीईटीपी यांना वेळोवेळी नोटीसा बजावल्या असून, त्यांच्या विरुध्द पालघर येथील न्यायालयात खटले दाखल केलेले आहेत. तसेच सामुहीक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेचे संमतीपत्र सुध्दा नाकरले आहेत. सामुहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्र तारापूर व्यवस्थितरित्या कार्यान्वित असल्यामुळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे दि ०६ ०३ २०१६ रोजी एम आय डी सी ने ताब्यात घेवून चालविण्याचे निर्देश दिले आहेत. तारापूर औद्योगिक क्षेत्रातील उद्योगांना म.प्र.नि.मंडळाने दिनांक ७/१०/२०१६ रोजी म.औ.वि.महामंडळ यांना पूरविण्यात येणाऱ्या पाण्यामध्ये ४० टक्के पाणी कपातीचे आदेश दिले त्यानुसार, त्यानुसार १५ एमएलडी औद्योगिक सांडपाणी कमी करण्यात आले.

तारापर औद्योगिक वसाहती करिता टीईपीएस मार्फत अतिरिक्त ५० दशलक्ष घन मिटर क्षमतेचे नविन सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारण्याचे काम सुरु असून, डिसेंबर २०१८ मध्ये पूर्णाबाबत प्रायोगिक चाचणी घेतली जाईल.

राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्था (एनआयओ) या रष्ट्रीय संस्थेकडून एप्रिल २०१६ मध्ये म.औ.वि.महामंडळास प्राप्त अहवालानुसार प्रक्रियाकृत संडपाण्याच्या विल्हेवाटीचे ठिकाण नवापूर किनाऱ्यापासून ७.१ कि.मी.खोल समुद्रात ठरवून दिले आहे. त्यानुसार निष्कासन वाहिनी टाकण्याचे काम म.औ.वि.महामंडळाने हाती घेतले असून ते अंदाजे २.७ कि.मी.पर्यन्त पूर्ण झाले आहे. सद्यस्थितीत प्रक्रियाकृत सांडपाणी म.औ.वि.महामंडळातर्फे समुद्र किनाऱ्यापासून ५०० मीटर अंतरावर सोडण्यात येते.

दिनांक ९/४/२०१८ रोजी नवापूर खाडी लगत मासे मृत पावल्याची घटना घडली होती. त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, पालघर यांनी सातपाटी येथील नवापूर खाडीतील प्रदुषणामुळे मृत झालेल्या माशां संदर्भात विविध मच्छीमार सोसायटीचे प्रतिनिधी, मच्छिमार बांधव, मत्स्यविभागाचे अधिकारी व नवापूर, दांडी, उच्छेळी, मुरबे, नांदगाव, आलेवाडी, खारेकुरण, सातपाटी, माहिती, सरावली, कुंभवली

व कोलवडे सरपंच व उपसरपंच यांच्या समवेत आयोजित बैठकित दिनांक १७/४/२०१८ रोजी नवापूर, दांडी, उच्छेळी, दिनांक १९/४/२०१८ रोजी मुरबे, नांदगाव, आलेवाडी, खारेकुरण, दिनांक २१/४/२०१८ रोजी सातपाटी, माहिम, दिनांक २३/४/२०१८ रोजी सरावली, कुंभवली व कोलवडे येथील पाण्याचे व माशांचे नमुने विविध मच्छीमार सोसायटीचे प्रतिनिधी, मच्छीमार बांधव, मत्स्य विभागाचे अधिकारी यांच्या समवेत प्रत्यक्ष संकलिम करुन मोहर बंद करुन म.प्र.नि.मंडळाच्या मध्यवर्ती व शासनाच्या न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, मुंबई येथे माशांचे नमुने पृथ:करणासाठी पाठविण्यात आले होते. न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, मुंबई येथून प्राप्त अहवालानुसार कोणत्याही रासायकनिक वा विषय सदृष्य रसायनामुळे मासे मृत झालेले नाहीत.

नवापूर खाडीतील व समुद्रातील पाण्याचे पृथ:करण अहवालावरुन पाण्यातील, धतू संयुगे रासायकनिक ऑक्सिजन वैजैविक ऑक्सिजनची मात्रा मर्यादेपेक्षा जास्त प्रमाणात आढळून येते.

म.प्र.नि.मंडळाकडून जल (प्रदूषण नियंत्रण व नियमन) कायदा १९७४ अंतर्गत खाडीमध्ये औद्योगिक सांडपाणी सोडणाऱ्या (१) मे.ई.ओ.सि.या कारखान्यावर बंदचे व (२) मे.लुपिंन लि.या कारखान्यावर ५.०० लाख बँक हमी जप्तीची कारवाई करण्यात आली आहे. तसेच २०१७ व २०१८ सालामध्ये म.प्र.नि.मंडळाकडून तपासणी केलेल्या दोषी कारखान्यांवर केलेल्या कारवाईचा तपशील खालीलप्रमाणे -

| सन | २०१७ | २०१८ |
|---|---|---|
| कारणे दाखवा नोटीस | ३६ | ४७ |
| प्रस्तावित आदेश | १९ | १२ |
| अंतरिम निदेश | ११ | १९ |
| उत्पादन बंदचे आदेश | २५ | ४२ |

तालुका आरोग्य अधिकारी, पालघर यांच्या अहवालानुसार तारापूर औद्योगिक वसाहतीतील घातक रसायनिक घन कचऱ्यांच्या दुर्गंधीमुळे आजारी झालेले कोणतेही रुग्ण सन २०१८ पासून बाह्यरुग्ण विभाग तसेच आंतररुग्ण विभागात दाखल झालेले नाहीत.

मे. विराज प्रोफाईल लिमिटेड या उद्योगाचे तारापूर विभागात चार कारखाने कार्यरत असून, तारापूर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील मे. विराज प्रोफाईल लिमिटेड प्लॉट क्रमांक-जी-१/४,एम.आय.डी.सी., तारापूर या उद्योगाला महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक २७ ऑगस्ट,२०१८ रोजी उत्पादनामधून निघणाऱ्या पाऊडर स्लॅग विना परवानगी विल्लेवाट लावत

असल्याबाबत कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. तद्नंतर उद्योगा सोबत सुनावणी घेण्यात आलेली आहे. मे. विराज प्रोफाईल लिमिटेड या कारखान्याने सर्वे क्र. १२१ बेटेगाव, जिल्हा-पालघर या ठिकाणी घातक घनकचऱ्या संबंधित उद्योगावर कायद्यानुसार कारवाई करण्याची प्रक्रिया चालू आहे. तारातपूर औद्योगिक वसाहतीच्या बाहेर असणाऱ्या विराज प्रोफाईल लिमिटेड कंपन्यांकडून खाडी व समुद्रामध्ये घनकचरा व विना प्रक्रिया सांडपाणी सोडलेबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा भेटी दरम्यान आढळलेलेनाही.

**************